लोकशाही वार्ता

# प्रतिबिंब

स्नेहवन ३

नागपूर, रविवार, २२ जून २०२५ epaper.lokshahivarta.in lokshahivartapratibimb@ gmail.com

आतील पानांत


'एफएमसीजी'पुढील आव्हाने /२


दर्शन अष्टविनायकांचे! /४

गूगलचा चष्मा साधणार संवाद /४


जागतिक पातळीवरील मुडीज् इन्व्हेस्टर सर्व्हिस यांनी गेल्या महिन्यात आर्थिकदृष्ट्या बलाढ्य असलेल्या अमेरिकेचा पतदर्जा खाली आणला. या घटनेमुळे जगातील कोणतेही शेअर बाजार कोसळले नाहीत, किंवा त्यावर वृत्तपत्रांचे रकाने भरभरून लिहिले गेले नाही. परंतु, या घटनेमुळे अमेरिकेच्या अविश्वसनीय आर्थिक वर्चस्वाला धक्का बसला असून, त्या युगाचा अंत होण्यास प्रारंभ झाला आहे. या पार्श्वभूमीवरील हे विश्लेषण...

# अमेरिकेच्या आर्थिक वर्चस्वाचा अंत होण्यास प्रारंभ?





कव्हर स्टोरी

प्रा. नंदकुमार काकिर्डे

सुमारे महिन्याभरापूर्वी म्हणजे १६ मे रोजी जागतिक पातळीवरील मूडीज् इनव्हेस्टर सर्व्हिस या पतदर्जा देणाऱ्या संस्थेने अमेरिकेचा पतदर्जा खाली आणला. सध्याच्या एएएवरून तो एए१, असा खाली आणला. याचे प्रमुख कारण म्हणजे अमेरिकेच्या डोक्यावरील वेगाने वाढणारे सरकारी कर्ज व त्यापोटी सातत्याने फुगत जाणारी वित्तीय तूट होय. त्यांच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) तब्बल १२० टक्के कर्जाचा डोंगर झालेला आहे. वाढती तूट व कर्जे या दोन्ही गोष्टी अमेरिकेच्या आर्थिक आरोग्याबद्दल चिंता स्पष्ट करतात.

पुढील दहा वर्षांमध्ये अमेरिकेची वित्तीय तूट ही त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या म्हणजे जीडीपीच्या नऊ टक्केपर्यंत वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. यामुळे त्या देशातील कर्ज घेण्याचा खर्च हा सातत्याने वाढू शकतो व गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होऊ शकतो. याचेच फलित म्हणून अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेमध्ये संभाव्य मंदी आणखी लवकर येऊ शकते. एवढेच नाही तर आजच्या घडीला जागतिक राखीव चलन म्हणून त्यांचा डॉलर अग्रभागी आहे. या घडामोडींमुळे पुढील काही वर्षांमध्ये अमेरिकन डॉलरचे वर्चस्व निश्चितपणे प्रभावित होऊ शकते आणि जागतिक व्यापारावरील त्याची पकड ढिली होण्यास हातभार लागू शकतो. याचा परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापार व गुंतवणुकीवर झाल्याशिवाय राहणार नाही. सध्या जागतिक पातळीवर युद्धाचे सावट पसरलेले आहे. युक्रेन- रशिया यांच्यातील युद्ध व इस्त्रायलने इराणवर नुकताच केलेला हल्ला हा तिसऱ्या महायुद्धाची नांदी ठरू शकते. इराण स्वस्थ बसणार नाही. जशास तसे, या न्यायाने तो उत्तर देणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. यातूनच महायुद्धाची ठिणगी पडू शकते. अशा परिस्थितीत जागतिक अर्थव्यवस्था आणखी गर्तेत किंवा मंदीसदृश अवस्थेकडे वेगाने वाटचाल करू शकेल.

अमेरिकेची आर्थिक महासत्ता भारताच्या दृष्टिकोनातून एक महत्त्वाचा भागीदार आहे. आपले व त्यांचे व्यापारी संबंध आहेत. त्यामुळे भारताबरोबरच अन्य काही विकसनशील देश आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर या घटनेचे दूरगामी परिणाम होऊ शकतील. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करायचा झाला, तर आपल्या देशातील पायाभूत भांडवल मिळण्याची प्रक्रिया मंदावू शकते. त्याचा परिणाम आपल्या चलनाचे अवमूल्यन होणे, व्याजदरात वाढ होण्याची, तसेच आर्थिक विकास कमी होण्याची शक्यता निर्माण होते.

आपल्या अर्थव्यवस्थेचा विचार करायचा झाला, तर आपला पतदर्जा अनेक विकसित अर्थव्यवस्थांपेक्षा खाली आहे. अमेरिकेचा पतदर्जा खाली गेल्यामुळे आपल्या पतदर्जावर कोणताही थेट परिणाम निश्चित होणार नाही, परंतु जागतिक अर्थव्यवस्थेचा विचार करायचा झाला, तर आपला पतदर्जा सुधारण्याच्या दृष्टिकोनातून आपल्यासमोर अनेक आव्हाने उभी सुविधांच्या विकासासाठी आपण परकीय गुंतवणूक आणि कर्जावर अवलंबून आहोत. अमेरिकेच्या पतदर्जामध्ये घट झाल्यामुळे भारतासाठी कर्ज घेण्याचा खर्च निश्चितपणे वाढू शकतो. एक प्रकारे आंतरराष्ट्रीय भांडवली बाजारपेठेमध्ये आपल्याला प्रवेश करणे हे महाग होऊ शकते.

एखादी संस्था, कंपनी किंवा देश यांचा पतदर्जा जर खालावला गेला, तर त्याचे अनेक परिणाम होताना आपण पाहतो. भारतासारख्या विकसनशील बाजारपेठांमध्ये राहतात.


'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेमध्ये भारतीय अर्थव्यवस्था सुदृढ करण्याचा अंतर्भाव आहे. त्यामुळे जागतिक बाजारपेठेमध्ये निर्माण होणाऱ्या आव्हानांना न जुमानता अमेरिकेच्या पतदर्जाची घसरण आपल्याला एक नवीन संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. आजही अनेक देश गुंतवणुकीसाठी भारताचा विचार करताना दिसतात. अमेरिकेत गुंतवणूक करण्याबाबत हे देश निश्चित सावधगिरी बाळगत असताना, आपल्या मजबूत अर्थव्यवस्थेकडे वळू शकतात. ही मोठी संधी आपल्याला उपलब्ध होऊ शकते. येथील गुंतवणुकीमध्ये वैविध्य आहे. केवळ पायाभूत सुविधाच नाही, तर उत्पादन क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, औषध निर्माण व वित्तीय सेवा क्षेत्र यामध्ये गुंतवणूक करणे जास्त आकर्षक असल्याने वाढत्या गुंतवणुकीचा संभाव्य लाभार्थी म्हणून भारताचा निश्चित विचार होऊ शकतो. या दृष्टिकोनातून आपली अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर उदयास येत आहे. आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक विकासाच्या अनेक संधी उपलब्ध होताना दिसत आहेत. एका बाजूला जागतिक पातळीवर सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश म्हणून आपण प्रथम क्रमांकावर पोहोचलेलो असताना आपल्याकडील मध्यमवर्गीय बाजारपेठ ही अन्य देशांना किंवा गुंतवणूकदारांना आकर्षित करणारी आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेचा विचार केला, तर गेल्या काही वर्षांच्या अस्थिर व अनिश्चित परिस्थितीमध्ये आर्थिक विश्लेषकांनी अमेरिकेच्या घसरत्या अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करण्याची संधी गमावलेली आहे, असे वाटते. जगाच्या आर्थिक इतिहासाचे सिंहावलोकन केले, तर काही बदल हे संकटाच्या गर्जनेने किंवा अपघाताच्या भीतीने होत नाहीत. मात्र ते बदल अपरिहार्यतेच्या शांत पद्धतीने येत राहतात व आपल्यासमोर संकटाच्या माध्यमातून उभे ठाकतात. जागतिक पातळीवरील बलाढ्य अर्थव्यवस्थेचा पतदर्जा घसरल्यामुळे कोणत्याही आपत्कालीन बैठका झाल्याचे आढळले नाही. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह या मध्यवर्ती बँकेने त्याची फारशी दखल घेतल्याचे वाचनात आले नाही किंवा गुंतवणूकदारांच्या आत्मविश्वासामध्ये काही बदल झाल्याचे आढळले नाही. एकंदरीत अमेरिका व बाह्य जग या घटनेमुळे डगमगलेले आढळले नाही. परंतु, गेल्या काही वर्षातील अमेरिकेची आर्थिक स्थिती, विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयातीवर लादलेले प्रचंड टॅरिफ शुल्क, काही अनाकलनीय आर्थिक निर्णय या सर्वांचा परिणाम अमेरिकेच्या अविश्वसनीय आर्थिक वर्चस्वाला धक्का पोहोचवणारे आहे यात शंका नाही. अर्थात ही घटना आपल्यासाठी निश्चितच आत्मपरीक्षण करण्यासारखी आहे. मतपेटींवर डोळा ठेवून सवंग लोकप्रिय आर्थिक निर्णय घेण्याचे आगामी काळात कटाक्षाने टाळले पाहिजे. अमेरिकेसारखा देश आपल्याला एका बाजूला मदत करणारा वाटत असला, तरीसुद्धा जागतिक पातळीवर त्यांची भूमिका आपल्या शत्रू राष्ट्रांना मदत करण्याकडे किंवा चुचकारण्याकडे आहे, हे विसरता कामा नये.

आज अनेक विकसनशील देश आर्थिक बेशिस्तीच्या मार्गावर आहेत. ब्राझील व दक्षिण आफ्रिका यांना प्रचंड व्याजदराची कर्जे घ्यावी लागल्याने त्यांची अर्थव्यवस्था डळमळीत झाली आहे. एवढेच नाही तर जर्मनी, कॅनडासारख्या विकसित देशांचीही कर्जे ढोबळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत धोक्याच्या पातळी पलीकडे गेलेली आहेत. भारताची आर्थिक स्थिती एवढी वाईट किंवा चिंताजनक नसली, तरीसुद्धा आपल्याला हा एकप्रकारे गंभीर इशारा समजणे आवश्यक आहे.

अनेकवेळा भारतातील अनेक राज्ये लोकानुनय करण्यासाठी वित्तीय शिस्तीला बगल देताना दिसले आहेत. काहीवेळा केंद्र सरकार त्यात भर घालते. त्यामुळे आर्थिक शिस्तीकडे कानाडोळा न करता, नजीकच्या काळात अर्थव्यवस्था बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करणे, हाच या निमित्ताने आपल्याला मिळालेला गंभीर इशारा आहे, हे राज्यकर्त्यांनी लक्षात घेण्याची गरज आहे.

■ (लेखक पुणेस्थित अर्थविषयक ज्येष्ठ पत्रकार असून, माजी बँक संचालक आहेत.)




# आषाढस्य प्रथम दिवसे...

*चक्क डोळ्यासमोर ऋतू कूस बदलून घेतो*
*पावसा आधी ढगांमध्ये कोठून गारवा येतो?*

कवी सौमित्र यांच्या 'गारवा' या पावसावरील कवितांमधील ह्या ओळी आठवल्या की ग्रीष्मामधून उन्हाळ्यातच ज्येष्ठ महिना सरताच आषाढाचे आगमन झाल्यावरचे वातावरण सौमित्र ह्यांनी वरील शब्दात नेमकेपणाने टिपले आहे, असे वाटते.

नेमके ऊन सरत नाही, ढगामधून पाणी झरत नाही आणि अशावेळी आषाढ आपल्या धुंदीत मस्तीत येत असतो. वाऱ्याचा वेग म्हणजे काय ते जाणवत राहावे, अशा ताकदीने झाडा-झुडपांना हलवत, आकाशातल्या काळ्या-पांढऱ्या ढगांना सैरावैरा उडवून! दोन ढग एकमेकांना घासले की, ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट, चमचमाट इत्यादी अधून-मधून सुरू होतो. उन्हाळ्यात झाडांची वाळलेली पाने वाऱ्याच्या वेगाबरोबर स्पर्धा करीत धावू लागतात. खरे तर आषाढातही पुन्हा काही झाडाच्या पानांची गळती होत असते. या काळातील बहुतांश पाने पिवळी होऊन पडत असतात. अनेक झाडांना या काळात बहरही येतो. मृग नक्षत्रात पावसाची झड लागली की, हा बहर गळूनही जातो.

आषाढ लागला की, चिंचेचे झाड नव्या पोपटी पालवीने मन मोहून घेते. आषाढामध्ये 'नाच रे मोरा आंब्याच्या बनात', असे म्हणणारे बालविश्व आजच्या काळात डोळ्यांनी दिसणेही दुरापास्त झाले आहे. मात्र अजूनही मेहकरच्या पैनगंगा नदीच्या काठावर 'छत्री कुत्री' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात, लोणार सरोवराच्याजवळ किन्ही रोडवर म्याव-म्याव, असा आवाज येतो आणि नाचायला सांगणारी पिढी नसली, तरी आषाढाच्या ढगाकडे पाहून मोर आजही नाचत असावा, असा दिलासा मनाला मिळतो. परिस्थिती कितीही बदलली, तरी आपण आपले काम करीत राहावे, हा संदेश जणू हा मोर आपला पिसारा फुलवून नाचताना देत असतो.

दि. २६ जून! महाकवी कालिदास दिन... यानिमित्त आषाढातील ऋतूवैभवाचा आढावा घेत असतानाच सध्याचे बदलते वास्तव डोळ्याआड करूनही चालत नाही. पूर्वीच्या काळी आषाढामध्ये झाडावर पिकून ज्याचा घमघमाट आसमंतभर पसरून राहायचा ते कवठाचे झाड आज-काल डोळ्यांनी दिसणेही कठीण झाले आहे.



आषाढाच्या बाजारामध्ये गर्दी होते ती जांभळाची. पिकलेले रसरशीत ताजे जांभूळ पाहताच तोंडाला पाणी सुटणार नाही, असा मनुष्य विरळाच. आषाढामध्ये बाजारात दिसणारा भाजीपाला कमी होतो आणि जेवढा असतो तेवढा हा महागाई कशाला म्हणतात, ते शिकवणारा असतो. पूर्वीच्या काळी आषाढामध्ये झाडावर पिकून ज्याचा घमघमाट आसमंतभर पसरून राहायचा ते कवठाचे झाड आज-काल डोळ्यांनी दिसणेही कठीण झाले आहे. मात्र आपला पर्णसांभार गमावून अंगभर फुले लेवून उन्हाळ्यातल्या सूर्याला वाकोल्या दाखवणाऱ्या पळस पांगरा, शर्वरी म्हणजेच काटेसावरी, पळस, शेवगा, गुलमोहर अशा अनेक झाडांवर पोपटी पानांची रंगछटा मन भूलवणारी असते. पेरूचे झाड आता लवकरच माझे दिवस येणार, असा इशारा देत हसत असते. आमच्या लहानपणी आषाढ समोर उभा ठाकला की, घराची कौले किंवा पत्रे छावण्याचे काम केले जात असे. त्यासाठी फार क्वचितप्रसंगी मजूर बोलवल्या जायचा. एरवी चार-पाच शेजारी-शेजारी राहत असलेले बापे पाऊस येण्यापूर्वी एकमेकांना मदत करीत. आज याचे- उद्या त्याचे, अशा पद्धतीने छप्पर नीट करून घेत. अश्या लहान-मोठ्या प्रसंगातून नेमकेपणाने शेजारधर्म कशाला म्हणतात, ते आम्ही लहानपणीच शिकलो होतो. मानव प्राणी पावसाळ्याचा सामना करण्यासाठी सज्ज होतो, अगदी त्याच पद्धतीने सृष्टीतील इतर प्राणीही आपापल्या परीने या ऋतूचा आनंद घेण्यासाठी आणि सामना करण्यासाठी सज्ज असतात.

पावसाच्या आगमनापूर्वी मुंग्यांच्या रांगा पावसाळाभर पुरेल एवढे अन्न घेऊन जाताना दिसतात. त्यांचे रांगेतील शिस्तबद्ध चालणे, पावसाळ्यात अन्न साठवून ठेवण्याची विचारशक्ती सर्वच अनाकलनीय!

नुकतेच दिवंगत झालेले अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या एका पुस्तकात झाडाची पाने कुस्करून डिंकाचा आणि मधाचा वापर करून ते अन्नाच्या रूपाने झाडाच्या ढोलीत ठेवून माकडे त्याचा पावसाळ्याच्या दिवसात अन्न म्हणून वापर करतात, असा संदर्भ वाचायला मिळाला होता!

■ किरण शिवहर डोंगरदिवे
वॉर्ड क्र. ७, समतानगर, मेहकर,
जि. बुलडाणा- ४४३३०१
मो. ७५८८५६५५७६

# आखाती देशांमध्ये शिक्षण कारकीर्द

चौफेर





बेरोजगारी वाढत असल्याने आणि अध्यापन व्यवसायात शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मर्यादित जागा उपलब्ध असल्याने, सेट/नेट परीक्षा उत्तीर्ण आणि डॉक्टरेट केलेल्या अनेक पदव्युत्तर विद्यार्थ्यांना चांगली नोकरी मिळविण्यासाठी मदतीची आवश्यकता असते. त्यांना दिल्या जाणाऱ्या नोकऱ्यांमध्ये कमी पगार आणि किमान भत्ते असतात. याचे कारण बऱ्याच शाळा आणि महाविद्यालये विनाअनुदानित असतात आणि वेतनश्रेणीनुसार पगार देत नाहीत.

आखाती देशांमध्ये अशा अनेक संधी आहेत, ज्याबद्दल शिक्षणाच्या संधी शोधणाऱ्या अनेक शिक्षितांना त्यांची माहिती नाही. आखाती देशांमध्ये शिक्षण किती फायदेशीर असू शकते, याची अनेकांना जाणीव नाही. आखाती देशांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांचा पुरवठादार म्हणून भारत सर्वात सुपीक क्षेत्रांपैकी एक बनला आहे. म्हणूनच, आर्थिक अडचणी असूनही शिक्षणासाठी सर्वोत्तम आणि तीक्ष्ण मेंदूची आवश्यकता असेल. अनेक देश भारतीयांना शोधतात, कारण त्यांनी क्षमता आणि कठोर परिश्रमाच्या बाबतीत ते सर्वोत्तम असल्याचे सिद्ध केले आहे.

परदेशात शिकवण्यासाठी पात्रता - सीबीएसई/आयजीसीएसई आणि आयबी अभ्यासक्रमाच्या अनेक शाळा आखाती देशांमध्ये आहेत. यामुळे भारतीयांसाठी शिकवण्याचे काम सोपे होते. या शाळा प्रामुख्याने शिक्षणात बॅचलर/मास्टर्स आणि डॉक्टरेट असलेले महाविद्यालय/विद्यापीठासाठी पदव्युत्तर पदवीधर शोधतात. त्यांचा शिक्षक/व्याख्याता म्हणून किमान दोन-चार वर्षांचा आणि समन्वयक/पर्यवेक्षक आणि प्राध्यापकांसाठी पाच-दहा वर्षांचा अध्यापन अनुभव असतो.

वर्तमानपत्रांमधील जाहिरातींव्यतिरिक्त, शाळेच्या वेबसाइटवर अध्यापन/रिक्त पदांमधील करिअर तपासत राहावे लागते. भरती एजन्सीदेखील अशी ठिकाणे आहेत, जिथे तुम्ही संपर्क साधू शकता. नेटवर्किंगमुळे नोकरी मिळविण्यात खूप मदत होते.

पगार आणि इतर फायदे- संपूर्ण आखाती शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पाच दिवसांच्या कामाच्या पद्धतीचे पालन केले जाते. शिक्षकाला सरकार आणि शिक्षण मंत्रालयाने जाहीर केलेल्या सुट्यांव्यतिरिक्त उन्हाळी सुटीचा हक्क आहे. शिक्षकांचा पगार हा अनुभव, पात्रता आणि पदनामानुसार, शाळा आणि अभ्यासक्रमानुसार बदलतो. बहुतेक शाळा आणि महाविद्यालये अतिशय आकर्षक करमुक्त पगार/वेतन स्केल, फायदे आणि भत्ते देतात. यामध्ये एचआरए/निवास, वैद्यकीय विमा, वार्षिक सशुल्क रजा, वार्षिक विमान भाडे आणि मुलांसाठी मोफत शिक्षण यांचा समावेश असतो. तथापि, ऑफर स्वीकारण्यापूर्वी, नोकरीची बाजारपेठ, देऊ केलेला सरासरी पगार, राहणीमानाचा खर्च आणि इतर तपशीलांबद्दल संपूर्ण संशोधन केले पाहिजे. सामाजिक जीवन- एकूणच आखाती देश शांतपणे राहतात. शिस्तबद्ध जीवन जगण्यासाठी या देशांमध्ये विशिष्ट नियमांचे पालन करावे लागते. येथे मोठ्या संख्येने परदेशी लोक आहेत. परदेशी लोक सामाजिक क्लब किंवा संस्था चालवतात, जिथे वार्षिक सदस्यता मिळवता येते आणि वर्षभरातील उपक्रम आणि उत्सवांचा आनंद घेता येतो. अधिकृत वीकेंड शुक्रवार आणि शनिवार असतो. शॉपिंग मॉल्स आणि इतर पर्यटन स्थळांव्यतिरिक्त, परदेशी लोक कॅम्पिंग, पोहणे आणि टेकडीवर गाडी चालवणे यासारख्या विविध साहसी क्रियाकलापांचा आनंद घेऊ शकतात.

■ ईश्वर देशमुख
(लेखक मूळचे नागपूरचे असून, ओमानमधील इंडियन स्कूल सलालाह येथे काम करतात. त्यांनी भारत आणि आखाती देशांमध्ये दोन दशकांहून अधिक काळ विविध नामांकित शाळांमध्ये शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख म्हणून कार्य केले आहे.)

# शेतीतून उभारली १०० कोटींची कंपनी

## सक्सेस स्टोरी

'हेल्दी अर्थ'चे संचालक विक्रमजीत सिंग यांनी कृषी तंत्रज्ञान आणि आधुनिक पद्धतींचा वापर करून स्थानिक शेतकऱ्यांना सक्षम बनवलंच, शिवाय कठोर परिश्रमातून १०० कोटी रुपयांची कंपनीही उभारली आहे.

आजच्या काळात तरुण शेतीला कमी नफ्याचा व्यवसाय मानतात आणि त्यापासून दूर राहतात. अशा वेळी विक्रमजीत यांचा प्रयत्न तरुणांना शेतीकडे आकर्षित करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचं पाऊल म्हणायला हवं.

विक्रमजीत हे पंजाबमधील लुधियाजवळच्या गहलेवाल गावचे आहेत. त्यांच्या मनात काहीतरी नवीन करण्याचा विचार आला. लहानपणापासूनच त्यांना शेतीची आवड होती. ही आवड



पूर्ण करण्यासाठी त्यांनी नोकरी करीत असतानाच डाळिंबाची लागवड केली; परंतु यात त्यांना तोटा होऊ लागला. त्यामुळे त्यांनी लिंबू शेती सुरू केली. हे सुरू असतानाच त्यांनी एमबीएची पदवी मिळवली. पुढे त्यांनी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला आणि स्वतःला पूर्णपणे शेतीच्या कामाला वाहून घेतलं.

त्यांनी २०० एकर जमीन भाडेतत्त्वावर घेऊन सेंद्रिय शेती सुरू केली. याशिवाय, फक्त एकच पीक घेण्याऐवजी, धान्य, भाज्या आणि फळे पिकवली. अशाप्रकारे शेतीचे अनेक भागांमध्ये विभाजन करून त्यांनी भरपूर नफा मिळवला. नंतर ते कंत्राटी शेतीकडे वळले. तिथे अनेक शेतकरी त्यांच्यासोबत काम करू लागले. व्यवस्थापन कौशल्य, स्थानिक शेतकऱ्यांकडून मिळालेला पाठिंबा आणि हुशारीच्या जोरावर १०० कोटींचं साम्राज्य निर्माण केलं! विक्रमजीत यांनी जनरेशन ऑफ फार्मिंग नावाची संस्था स्थापन केली आणि गेल्या काही वर्षांत या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शेकडो तरुणांना परदेशात जाण्याऐवजी देशातच रोजगार मिळवून दिला. ■

# 'एफएमसीजी'पुढील आव्हाने

'एफएमसीजी' म्हणजेच फास्ट मूव्हिंग कंझ्युमर गुड्स हे भारतीय अर्थव्यवस्थेतील चौथे सर्वात मोठे क्षेत्र आहे. डिटर्जंट्स, साबण, टॉयलेटरीज, डेंटल क्लीनर, सौंदर्यप्रसाधने, शीतपेये, चॉकलेट्स, कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि वेष्टनबद्ध खाद्यपदार्थ अशा अनेक क्षेत्रांचा त्यात समावेश होतो. सहा वर्षांपूर्वी एफएमसीजी बाजारपेठेची वार्षिक उलाढाल २३ अब्ज डॉलर्स इतकी होती. ती यंदा म्हणजे २०२५मध्ये २२०अब्ज डॉलर्सपर्यंत विस्तारेल, अशी अपेक्षा आहे. म्हणजेच अवघ्या सहा वर्षांमध्ये त्याचा नऊ-दहापट विस्तार होत आहे. आणखी पाच वर्षांमध्ये एफएमसीजीच्या विक्रीमध्ये ई-कॉमर्स खरेदीचा वाटा ११ टक्के असेल, असा अंदाज आहे.

बदलती जीवनशैली, दरडोई उत्पन्नातील वाढ, शहरांचा विस्तार आणि परदेशी ब्रँड्स, तसेच गॅजेट्समधील वाढती रुची यामुळे या उत्पादनांची मागणी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. भारत हा तरुणांचा देश असून, समाजमाध्यमे आणि डिजिटल व्यवहार यामुळेदेखील तरुण मनांवर नवनवीन वस्तूंचा प्रभाव पटकन पडतो आणि ऑनलाइन माध्यमातून झटपट खरेदी केली जाते. आयटीसी, वरुण बेव्हरेजेस, गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्स, हिंदुस्तान युनिलिव्हर, ब्रिटानिया इंडस्ट्रीज, नेस्ले इंडिया या कंपन्या शेअर बाजारात सतत चमकत असतात.

गेल्या दहा वर्षांमध्ये एफएमसीजी उद्योगातील महसूल सरासरी २१ टक्क्यांनी वाढतो आहे. याव्यतिरिक्त ग्रामीण भागात महसुलात १४-१५ टक्के वाढ होत आहे.

एफएमसीजीच्या एकूण बाजारपेठेचा ४५ टक्के महसुली हिस्सा हा ग्रामीण ग्रामीण भागातून येतो. ग्रामीण भागातील लोकांनाही वेष्टनबद्ध आणि चकचकीत उत्पादनांची भूल पडली आहे. शिवाय अर्थव्यवस्थेतील महिलांचा सहभाग वाढला आहे. तसेच महाराष्ट्रासारख्या काही राज्यांमध्ये लाडकी बहीण योजना राबवली जात असल्यामुळे महिलांच्या हातात खर्च करण्याजोगे उत्पन्न आलेले आहे.

एफएमसीजीमध्ये कार्यरत असलेल्या बहुतेक कंपन्यांना उत्पादन प्रकल्प, यंत्रसामग्री, उपकरणे आणि इतर स्थिर मालमत्तांमध्ये गुंतवणुकीसाठी तुलनेने कमी



**दहा वर्षांपूर्वीचे दहा रुपये किमतीचे बिस्किटांचा पुडा आजही तितक्याच किमतीला आहे; परंतु त्याचा आकार लहान झाला आहे! भाववाढ टाळण्यासाठी कंपन्यांनी उत्पादनांचा आकार कमी करीत किंमत कायम ठेवली आहे. दुसरीकडे, अनेक कंपन्या आता कमी किमतीचे छोटे पॅक बाजारात आणत आहेत. उत्पादनाचे वजन कमी करून पाच, दहा आणि वीस रुपयांच्या व्हॅल्यू पॅकवर कंपन्या भर देत आहेत. भारतीय ग्राहक अनेक गोष्टींचे छोटे पॅक खरेदी करण्यास पसंती देत आहेत. किराणा आणि घरगुती वस्तूंच्या वाढत्या किमती त्यांना त्यांच्या बजेटमधून बाहेर काढत आहेत.**

भांडवलाची आवश्यकता असते. मात्र त्याचवेळी स्पर्धकांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे, बाजारपेठेतील हिस्सा वाढवणे विविध कंपन्यांच्या दृष्टीने आव्हानात्मक होत चालले आहे. उत्पादन विकास, बाजारपेठ संशोधन आणि प्रॉडक्ट लाँच करण्यापूर्वी कराव्या लागणाऱ्या जाहिरांतीवरील खर्च मोठा असतो. या पार्श्वभूमीवर, एफएमसीजी बाजारपेठविषयक ताज्या अहवालानुसार, बाजारातील छोटे खेळाडू उत्तम कामगिरी करू लागले आहेत.

खाद्यपदार्थ आणि खाद्यपदार्थेतर क्षेत्रात लहान कंपन्यांची कामगिरी सरस आहे. याचे कारण, लहान कंपन्यांच्या उत्पादनांच्या किमती तुलनेने कमी आहेत. त्यामुळे त्यांच्या मालाच्या विक्रीतही लक्षणीय वाढ झाली आहे. भारतातील एफएमसीजी बाजारपेठेतील ४६ टक्के हिस्सा हा बड्या कंपन्यांनी व्यापला आहे. तर त्यांना टक्कर देणाऱ्या लहान कंपन्यांचा वाटा हा १७ टक्के इतका आहे. आपला उत्पादनखर्च वाढलेला असूनही त्या प्रमाणात आपल्याला किमती वाढवणे शक्य होत नसल्याचे नेस्ले इंडिया, ब्रियानिया इंडस्ट्रीज यासारख्या कंपन्यांकडून सांगण्यात येत आहे.

नूडल्स असोत अथवा बिस्किटे, त्यांच्या उत्पादन क्षेत्रात तुफान स्पर्धा आहे, तर हिंदुस्तान युनिलिव्हर आणि गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट्ससारख्या कंपन्या आपली अनेक होम आणि पर्सनल केअर उत्पादने लहान पॅक्समध्ये आणत आहेत. उत्पादनांच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने ग्राहक स्वस्त पर्याय शोधत आहेत. भारतातील अनेक लहान शहरांमध्ये त्या-त्या ठिकाणची बिस्किटे, आइस्क्रीम्स वा नूडल्सची स्थानिक प्रॉडक्टस बाजारात असतात. त्या-त्या शहरातील लहान कंपन्यांची ही उत्पादने लोकप्रियही असतात.

एकेकाळी पुण्यात साठे बिस्किट्सचा बोलबाला होता. डोंगरे बालामृतसारखे अनेक ब्रँड्स लोकप्रिय होते. अनेकदा मोठ्या ब्रँड्सशी साधर्म्य साधत, काही लहान कंपन्या आपली उत्पादने बाजारात आणतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जाहिरातींवरचा खर्च तुफान असतो. शाहरुख खान, अमिताभ बच्चनसारख्यांना काही कोटींमध्ये मानधन देऊन जाहिराती केल्या जातात. समाजमाध्यमांवरून जाहिराती करण्यासाठी मोठे बजेट ठेवले जाते. मात्र हा खर्च ग्राहकांकडूनच वसूल केला जात असतो.

दहा वर्षांपूर्वीचा दहा रुपये किमतीचा बिस्किटांचा पुडा आजही तितक्याच किमतीला आहे; परंतु आकार लहान झाला आहे. भाववाढ टाळण्यासाठी कंपन्यांनी उत्पादनांचा आकार कमी करीत किंमत कायम ठेवली आहे. दुसरीकडे, अनेक कंपन्या आता कमी किमतीचे छोटे पॅक बाजारात आणत आहेत. उत्पादनाचे वजन कमी करून पाच, दहा आणि वीस रुपयांच्या व्हॅल्यू पॅकवर कंपन्या भर देत आहेत.

भारतीय ग्राहक अनेक गोष्टींचे छोटे पॅक खरेदी करण्यास पसंती देत आहेत. कारण किराणा आणि घरगुती वस्तूंच्या वाढत्या किमती त्यांना त्यांच्या बजेटमधून बाहेर काढत आहेत. साबण, नाश्ता आणि चहा यासारख्या वस्तूंना महागाईचा सर्वाधिक फटका बसला आहे. नुवामा इंस्टिट्यूशनल इक्विटीजच्या विश्लेषकांनी एका नोटमध्ये म्हटले आहे की, पाम तेलाच्या किमती सुमारे ३० टक्के वाढल्या आहेत. किमती वाढल्यामुळे, ग्राहक लहान पॅक खरेदी करीत आहेत. त्यामुळे व्हॉल्यूमवर नकारात्मक परिणाम होत आहे.

महागाईचा तडाखा सहन करणाऱ्या एफएमसीजी कंपन्यांनी तिमाहीमध्ये किमती वाढवल्या आहेत. काही कंपन्यांनी साबणाच्या किमतीत सुमारे दहा टक्के वाढ केली असून, काहींनी आपल्या स्नॅक्सच्या, तर काहींनी आपल्या चहाच्या किमती वाढवल्या आहेत. काही कंपन्या किमती आणखी वाढवू शकतात, असे विश्लेषकांनी सांगितले.

कमकुवत शहरी मागणीमुळे एफएमसीजी कंपन्यांची वाढ मंदावली आहे. त्याचवेळी चांगल्या पावसामुळे ग्रामीण भागातील बाजारपेठेमध्ये वर्दळ आहे. तथापि, पुनर्प्राप्ती धिमी आहे. ग्राहकांनी एक किलो चहा आणि मल्टीपॅक साबण खरेदी करण्याऐवजी ५०० ग्रॅम चहाचे पॅक आणि एक किंवा दोन साबण खरेदी करण्यास सुरुवात केल्यास, कंपन्यांच्या तिमाही वाढीवर नक्कीच परिणाम होईल.

■ हेमंत देसाई

## लेखकांसाठी सूचना

**लोकशाही वार्तेने 'प्रतिबिंब' पुरवणीत 'लोकसमीक्षा' या स्तंभांतर्गत पुस्तक समीक्षा/पुस्तक समीक्षणाचा स्तंभ सुरू केला आहे. लेखकांनी त्यांच्या पुस्तकाचे समीक्षण lokshahivartapratibimb@gmail.com या इमेलवर शक्य असल्यास युनिकोडमध्ये किंवा पुढील पत्यावर पाठवावे. योग्य समीक्षणास प्रसिध्दी देण्यात येईल. पुस्तक किमान दोन महिन्यात प्रसिध्द झालेले असावे. लिफाफ्यावर 'लोकसमीक्षा' स्तंभासाठी असा उल्लेख करावा. समीक्षणासाठी पुस्तक अनिवार्य राहील.**

'प्रतिबिंब'मध्ये लिहिणाऱ्या सर्व लेखकांचे स्वागत आहे. रविवार पुरवणीचे नवे-बदललेले स्वरुप आपल्याला आवडले असेल, असा विश्वास वाटतो. आपले लेख, ललित, लघुकथा, हास्यकथा तसेच पर्यटन, दिन विशेष या सदराअंतर्गत साहित्य जास्तीत जास्त ६०० शब्दांपर्यंत पाठवायचे आहे. अंकाबाबत आपला अभिप्राय, प्रतिसाद आम्हाला आवर्जून कळवा. आमचा पत्ताः lokshahivartapratibimb@gmail.com जे लेखक आपले लेख 'ई-मेल'द्वारे पाठवतात, त्यांनी ४ सी वा 'युनिकोड' फॉंटमध्ये पाठविल्यास ते अधिक सोईचे होईल. तेव्हा शक्यतोवर या फॉंट्समध्ये पाठविण्याचा प्रयत्न करावा, ही विनंती. अर्थात श्री लिपीमध्ये लेखन पाठविणाऱ्यांचेही स्वागतच आहे. जे लेखक टपालाने आपले साहित्य पाठवू इच्छितात, त्यांनी मूळ हस्तलिखिताची प्रत पुढील पत्त्यावर पाठवावी, ही विनंती.

:: आमचा पत्ता ::

**संपादक, प्रतिबिंब, लोकशाही वार्ता, थर्ड फ्लोअर, थापर एनक्लेव्ह-२, १४८, युनिव्हर्सिटी लायब्ररी रोड, रामदासपेठ, नागपूर-४४००१०**

## दिनविशेष



# छत्रपती शाहू महाराज

प्रभावी समाजसुधारक चौथे शाहू अर्थात छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे जयसिंगराव (आप्पासाहेब), आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व शाहू हे नाव ठेवले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते.

शाहू महाराजांचा २६ जून हा जन्म दिवस 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून पाळला जातो. शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद



केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला.

१९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. कोल्हापुरात विविध संस्थांची निर्मिती त्यांनी केली. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठी सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले.

शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. स्वातंत्र्यापूर्वी अनेक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अंमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. महाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. राजर्षी शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी फार तळमळ होती. कारण माणसाला पशुत्वापासून मनुष्यत्व मिळवून देणारे एक प्रभावी अस्त्र म्हणजे शिक्षण होय. त्यामुळे शिक्षणाशिवाय आपला उद्धार होणार नाही, हे राजर्षींनी ओळखले होते. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. एक महान मानवतावादी राजा म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी आपली ओळख निर्माण केली.

या व्यापक दूरदृष्टीच्या राजाने त्याकाळी राजेशाही असतांनासुद्धा सामाजिक बंधूभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरुपाचे कार्य केले. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. ■

# व. पु. काळे

वसंत पुरुषोत्तम काळे हे मराठी भाषेतील लेखक होते. ते 'वपु' या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांनी ६० पेक्षा जास्त पुस्तके लिहिली आहेत. पार्टनर, वपुर्झा, ही वाट एकटीची आणि ठिकरी ही पुस्तके विशेष प्रसिद्ध आहेत. ते प्रसिद्ध कथाकथनकार होते. त्यांचे १,६०० पेक्षा जास्त कथाकथनाचे कार्यक्रम झाले होते. ध्वनीमुद्रणाच्या माध्यमातून येणारे ते पहिले मराठी लेखक होत. काळे हे व्यवसायाने आर्किटेक्ट होते.

व.पु.काळे मुंबई महानगरपालिकेत होते. पेशाने वास्तुविशारद होते. लेखक, कादंबरीकार, कथाकथनकार, अशी ख्याती असलेल्या व.पु.काळे अर्थात वसंत पुरुषोत्तम काळे यांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी झाला. आपण सारे अर्जुन, गुलमोहर, गोष्ट हातातली होती, घर हरवलेली माणसं, दोस्त, मी माणूस शोधतोय, वन फोर द रोड, रंग मनाचे, माणूस, वपुर्झा, हुंकार, असे संग्रह प्रसिद्ध आहेत.

महाराष्ट्र शासनाचा उत्तम लेखकाचा सन्मान, पु.भा.भावे पुरस्कार, फाय फाउंडेशनचा पुरस्कार मिळाला. अमेरिकेत आयोजित करण्यात आलेल्या साहित्य संमेलनात अध्यक्षपद बहाल केले गेले. २६ जून २००१ रोजी मुंबई येथे हृदयविकाराने त्यांचं राहत्या घरात निधन झाले. ■

# डॉ. गंगाधर पानतावणे

डॉ. गंगाधर विठोबा पानतावणे (२८ जून १९३७- २७ मार्च २०१८) हे मराठीतील लेखक, संशोधक, समीक्षक व आंबेडकरवादी विचारवंत होते. ते पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, वैचारिक साहित्याचे एक निर्माते व अस्मितादर्श चळवळीचे जनक होते. त्यांचा जन्म २८ जून १९३७ रोजी नागपूरच्या पाचपावली वस्तीत झाला. त्यांचे डी. सी. मिशन स्कूल येथे प्राथमिक शिक्षण झाले, तर नवयुग विद्यालय आणि पटवर्धन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा नागपूरमध्ये आले होते, तेव्हा त्यांना पाहून ते अतिशय प्रभावित झाले होते. दुसऱ्यांदा जेव्हा बाबासाहेब नागपुरात आले, तर पानतावणे यांना त्यांना भेटण्याचा आणि त्यांच्याशी बोलण्याचा योग आला.

१९५६ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पानतावणे यांनी नागपूर महाविद्यालयातून बी. ए. व एम. ए.ची पदवी मिळवली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेकडून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. मराठवाडा विद्यापीठातून ते १९८७ साली पीएच. डी. झाले. यासाठी त्यांनी बाबासाहेबांच्या पत्रकारितेवर 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा शोधप्रबंध लिहिला. त्यानंतर याच विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. १९६३ मध्ये पानतावणे नागपूरहून औरंगाबादमध्ये




स्थायिक झाले आणि मिलिंद महाविद्यालयात नोकरी करण्यास सुरुवात केली. तिथेच त्यांनी साहित्य चळवळ सुरू केली; तिला तरुणांचा आणि विचारवंतांचा मोठा पाठिंबा मिळाला.

दलित साहित्याने अंधार नाकारला आहे, कलंकित भूतकाळ नाकारला आहे. मानसिक गुलामगिरीतून दलित मुक्त होऊ पाहत आहेत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानातून ते तेजस्वी होत आहेत, अशा शब्दांत दलित साहित्याची पाठराखण करीत पानतावणे यांनी महाराष्ट्रातील साहित्यिकांची मोठी फळी घडवली. पानतावणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथून प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाले. दलित साहित्याचे मुखपत्र असलेल्या 'अस्मितादर्श' या वाङ्मयीन नियतकालिकाचे संस्थापक संपादक म्हणून त्यांनी ५० वर्षांपर्यंत कार्य केले. या नियतकालिकाच्या माध्यमातून त्यांनी अनेक साहित्यिक मराठी साहित्यविश्वाला दिले. सॅनहोजे (अमेरिका) येथे पार पडलेल्या पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

यासोबतच विदर्भ साहित्य संमेलन (आनंदवन, वरोरा), मराठवाडा साहित्य संमेलन (परभणी), या व इतर अनेक साहित्य संमेलनांचे ते अध्यक्ष होते. साहित्य, समाज आणि संस्कृती या विषयांवरील त्यांचे एकूण २० वैचारिक व संशोधनपर ग्रंथ प्रकाशित आहेत. भारत सरकार, तसेच महाराष्ट्र शासनाच्या साहित्य, समाज तथा संस्कृतिविषयक अनेक समित्यांवर त्यांनी कार्य केले. साहित्यक्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना विविध पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्र सरकार आणि विविध साहित्य संस्थांचे पुरस्कार त्यांच्या ग्रंथांना प्राप्त झाले. त्यांच्या योगदानाबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने गौरववृत्तीने सन्मानित केले. साहित्य अकादमीकडून सन्मानित करण्यात आले. त्यांना २०१८ सालच्या पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. २७ मार्च २०१८ रोजी दीर्घ आजाराने त्यांचे निधन झाले. ■

# डॉ. वि. भि. कोलते

डॉ. विष्णू भिकाजी कोलते (२२ जून १९०८ - ८ एप्रिल १९९८) हे मराठी लेखक, महानुभाव साहित्याचे संशोधक व कवी होते. त्यांना इ.स. १९९१ साली पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. विष्णू भिकाजी कोलते यांचा जन्म २२ जून १९०८ रोजी नरवेल नावाच्या गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण



मलकापूर येथे, तर महाविद्यालयीन शिक्षण खामगाव व नागपूर येथे झाले. १९३० साली त्यांनी एम.ए. पदव्युत्तर अभ्यासक्रम पुरा केला. १९३१ ते १९४४ या कालखंडात अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात, तर १९४४ ते १९६४ या कालखंडात नागपुरातील मॉरिस कॉलेजात त्यांनी मराठी विषय शिकवला.

१९६६ ते १९७२ या काळात ते नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू होते. त्यांनी काव्य, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या ललित साहित्य प्रकारांच्या क्षेत्रात आपली लेखणी चालविली.

सोबतच अनेक ललित साहित्य कृतींचा आस्वाद घेऊन समीक्षालेखनही केले. संपादन आणि संशोधन कार्यात तर त्यांचे योगदान लक्षणीय आहे. प्राचीन शिलालेख, ताम्रपटांचे तसेच मध्ययुगीन मराठी साहित्याचे संपादन , संशोधन करून साहित्याच्या क्षेत्रात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त केले. त्यांचे आत्मचरित्र अजुनी चालतोच वाट या नावाने १९९४ साली प्रकाशित झाले. ■



# बालगंधर्व

**बालगंधर्व हे भास्करबुवा बखले यांचे शिष्य आणि मास्तर कृष्णरावांचे गुरुबंधू होत. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांचे गाणे ऐकून लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी त्यांना 'बालगंधर्व' ही पदवी बहाल केली. पुढे ते त्याच नावाने लोकप्रिय झाले. बालगंधर्वांची रंगभूमीवरील कारकीर्द किर्लोस्कर संगीत मंडळी या नाट्यसंस्थेत १९०५ साली सुरू झाली.**

नारायण श्रीपाद राजहंस, ऊर्फ बालगंधर्व (२६ जून १८८८ - १५ जुलै १९६७) या नावाने अधिक लोकप्रिय असलेले विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील मराठी रंगभूमी आणि चित्रपटांतील अभिनेता, गायक आणि नाट्यनिर्माते. रंगभूमीवर स्त्रिया अभिनय करीत नसतानाच्या काळात आपल्या हुबेहुब रंगवलेल्या स्त्री-भूमिकांमुळे बालगंधर्वांनी मोठी लोकप्रियता मिळवली. नाट्यगीतांसह ख्याल, ठुमरी, गझल, दादरा, भक्तिगीते यासारख्या गायन प्रकारांवरही त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते.

नारायण श्रीपाद राजहंस यांचा जन्म २६ जून १८८८ रोजी पुणे येथे झाला. बालगंधर्व हे भास्करबुवा बखले यांचे शिष्य आणि मास्तर कृष्णरावांचे गुरुबंधू होत. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांचे गाणे ऐकून लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी त्यांना बालगंधर्व ही पदवी बहाल केली. पुढे ते त्याच नावाने लोकप्रिय झाले.

बालगंधर्वांची रंगभूमीवरील कारकिर्द किर्लोस्कर संगीत मंडळी या नाट्यसंस्थेत १९०५ साली आरंभली. मात्र, तिचे एक भागीदार नानासाहेब जोगळेकर यांच्या १९११ मध्ये निधनानंतर संस्थेत वाद झाले. परिणामी १९१३ मध्ये बालगंधर्वांनी, गणेश गोविंद (गणपतराव) बोडस आणि गोविंदराव टेंबे यांच्यासह ती संस्था सोडली आणि गंधर्व संगीत मंडळीची स्थापना केली. १९२१मध्ये कर्जात अडकलेल्या या नव्या कंपनीचे नारायणराव राजहंस हे एकमेव मालक होते. त्यानंतर त्यांच्या नाटकांनी मिळवलेल्या लोकप्रियतेच्या जोरावर त्यापुढच्या सात वर्षांत कंपनीने सर्व देणी फेडली.

प्रभात फिल्म कंपनीसाठी बालगंधर्वांनी 'धर्मात्मा' चित्रपटात संत एकनाथांची भूमिकाही केली. त्यांनी आपल्या भूमिका साकारतानाच संगीत नाटक आणि नाट्यसंगीत हे कलाप्रकार मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबांमध्ये लोकप्रिय केले. नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, काकासाहेब खाडिलकर, राम गणेश गडकरी आणि वसंत शांताराम देसाई प्रभृतींनी लिहिलेली अनेक संगीत नाटके बालगंधर्वांनी केली.

भाऊराव कोल्हटकरांच्या १९०१ मधील निधनानंतर जेव्हा संगीत नाटक परंपरेला उतरती कळा आली, त्यानंतर बालगंधर्वांनी या परंपरेत मोलाची भर घालत ती पुढे नेण्याचे महत्त्वाचे कार्य केले. १९२९ सालच्या ४२ व्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. स्त्री भूमिकांसाठी महिला कलाकारांची गरज निर्माण झाल्यानंतर एप्रिल १९३८ मध्ये गोहर कर्नाटकी यांचा गंधर्व नाटक मंडळीत समावेश झाला. त्यांनी संगीत सौभद्र, संगीत मृच्छकटिक, संगीत शाकुंतल, संगीत मानापमान, संगीत संशयकल्लोळ, संगीत शारदा, संगीत मूकनायक, संगीत स्वयंवर, संगीत विद्याहरण, संगीत एकच प्यालासह एकूण २५ विविध नाटकांत भूमिका केल्या.

संगीत शाकुंतल नाटकातील 'शकुंतला' व मानापमान नाटकातील 'भामिनी' या भूमिकांमुळे एक प्रतिभावंत कलाकार म्हणून त्यांचे नाव सर्वत्र झाले. ५ जुलै १९६७ रोजी दीर्घ आजाराने बालगंधर्वांचे निधन झाले. ■

## साथ तू देशील का ?

पाऊसवेड्या या मनाला
साथ तू देशील का?
चिंब-चिंब भिजण्या या जीवाला
साथ तू देशील का?
काळोख दाटला लपल्या तारा
भरती आली आभाळाला
उभ्या कोसळत्या आषाढधारा
या धारांना कवितेत बांधण्या
शब्द तू होशील का ?
चिंब झाली धरा सारी
गोठ्यात हंबरे सर्जा राजा
पेरणीच्या चाढ्यावरती
मूठ तू धरशील का?
बिजांकूर हा उदरी रुजतो
हात जोडूनी बाहेर येतो
रात्रीमधूनी हात पसरतो
कवेत घेण्या आकाशाला
हात तू देशील का?
पुनवेची शीतलता तू
मी नभिचा चंद्रमा
सागराला भरती येण्या
माझ्यात तू रुजशील का ?
श्वास माझा स्पंदन माझे
तु श्वासांची पूर्तता
उतारकाळी सावरण्याला
काठी तू होशील का ?

■ डॉ. माधव शोभणे
नागपूर
मो. ९८५०८५७५८२

## मनासारखं व्हावं...

मनासारखं व्हावं, हे सर्वांनाच वाटतं
पर सर्वच व्हावं बरं, का तुम्हास पटतं?
मान्य आहे हे जरी, तरी कां असं होतं?
नाही झालं एखादं, मन हिरमुसून जातं

मनासारखं काहीच, होत नाही वाटतं
नशीबच वाईट मेलं, मग असंही सुचतं
जेही झालं आधी बरं, विसरल्या जातं
एका त्या न होण्यानं, सारं वाहून जातं

यावेळी मात्र जरा, दक्ष व्हायचं असतं
थोडं मागं वळून, फिरुन यायचं असतं
खूप काही बरेच, स्वत:च जवळ असतं
फक्त ते विवेकानं, शोधून घ्यायचं असतं

हळूहळू मन मग, होकार द्यायला लागतं
मनालाच मन जरा, स्वीकारायला लागतं
एकामागून एक मग, खूप सापडत जातं
नाही झालं जे आता, ते दूर पळून जातं

हे सारं करताना, स्व ओळखायचं असतं
क्षमता पात्रतेशी, जुळवून घ्यायचं असतं
आहे जे खूप आहे, मानून घ्यायचं असतं
मनाच्या आनंदानं, श्रीमंत व्हायचं असतं

■ संजयात्मन्
मेन रोड, नंदनवन, नागपूर
मो. ९४२२८०३०२२

## गोड तुझे नाम....

गोड तुझे नाम । मुखी सर्वकाळ ।
आई तुझा बाळ । भक्त तुझा ।।

तुजमुळे माझे । सुलभ जीवन ।
प्रसन्न वदन । नित्य असे ।।

तुज आठविता । मज येई बळ ।
दु:ख, मरगळ । दूर जायी।।

पावन चरणी । टेकतो मस्तक ।
बनतो सेवक । तुझा आई ।।

तुझे सुसंस्कार । बहुउपयोगी ।
आयुष्य निरोगी । तुजमुळे ।।

आलो तेजाकडे । तिमिरामधून ।
सुजाण बनून । नागरिक ।।

सर्वकाही शक्य । तुजमुळे झाले ।
प्राक्तन फळाले । माझे आई ।।

सत्य बोलायचे । सत्य वागायचे ।
तूज पुजायचे । मज आई ।।

अजू आई नामे । सत्कर्म करतो ।
असत्य टाळतो । बोलताना ।।

■ अजय रमेश चव्हाण
तरनोळी, ता. दारव्हा, जि. यवतमाळ
मो. ८८०५८३६२०७

## बालपणीचा काळ

बालपणीचा काळ सुखाचा
तुझा नि माझा सर्वांचा !

बालपण किती सुंदर होतं ।
मौजेचं नुसतं वादळ होतं ॥

भातुकलीचा खेळ होता ।
मस्त गोजिरा संसार होता ॥

मुरमुऱ्याच्या पोळ्या होत्या ।
फुटाण्याच्या पुऱ्या होत्या ॥

कागदाच्या नोटा होत्या ।
गंमत-जंमत भाज्या होत्या ॥

खाण्यातही समाधान होते ।
भरल्या पोटी हात होते ॥

खाट चादरीची झोपडी होती ।
चिमणी पाखरे खेळत होती ॥

कधी देवही रमला होता ।
मित्रांसवे खेळता-खेळता ॥

ब्रह्मांडाचा अधिपती ।
लोणी चोरी दिनराती ॥

बालपणीचा काळ सुखाचा ।
तुझा नि माझा सर्वांचा ॥

■ डॉ. मिलिंद इंदूरकर
नागपूर

## दारूची नशा

दारुड्याची दारू ।आहे एक नशा ॥
संसार दुर्दशा । होत असे ॥

कधीच नसते । नशा बाटलीत ॥
नशा मनातच । दारुड्याच्या ॥

उधार घेऊन । दारुड्या हा घेई ॥
देणाऱ्याला देई । शिव्या शाप ॥

संसार उद्ध्वस्त । दारुमुळे झाला ॥
पूर्ण विसरला । कुटुंबाला ॥

जेवायला नाही । अन्न कणभर ॥
दारू पोटभर । दारुड्याच्या ॥

घोटाने वाढली । दारुड्याची दारू ॥
आज विना दारू । करमेना ॥

दारूने दारुड्या। झाला हो भिकारी ॥
पोरं दारोदारी । फिरतात ॥

दारुड्याने दारू । सोडूनिया दिली ॥
कुटुंबही न्हाली । आनंदात ॥

■ प्रा .अरुण बाबाराव बुंदेले
अमरावती
मो. ८०८७७४८६०९

## काव्यफुले



## निरोगी आरोग्य

नित्यनेमाने मैदानी खेळू
विविध आजाराला आपण टाळू

सकाळच्या वेळी फिरायला जाऊ
मोकळया हवेतून प्राणवायू घेऊ

जो व्यायाम नित्य करी
वाढणार नाही त्याची ढेरी

स्फूर्ती वाढते काढता सूर्यनमस्कार
बलवान होण्यासाठी करू आळसावर वार

सुदृढ तन, तर सुदृढ मन
निरोगी आरोग्य हेच खरे धन

■ रवींद्र चालीकवार
मु. पो. ता. महागाव, जि. यवतमाळ
मो. ९०११५५९१०६

## दडी

मिरगात केला, मोठा गाजावाजा
रुसला का राजा, माह्यावर

ऋण रे काढून, पेरलं बियाणं
दिस रे डोयानं, वावरात

कायीज माह्यं रे,व्हते वर-खाली
येऊ दे खुशाली, आता तरी

व्हतं नोतं सारं, ठेवलं गहाण
कोमेजलं रान , तूह्याविन

नको पाहू चीत, तू रे हरघडी
मारू नको दडी पावसा तू!

■ दादाराव अवचार
मालेगांव
मो. ९७६४३३५०९९ .

## गर्भजाणिवा

तू आभाळभर भेटतो जेव्हा
तुझा नूर पावसाळी असतो
मी लिहायला घेतली लेखणी
अन् शब्द जाणिवेत कोसळतो.

ती प्रवाही थेंब वाणी ना!
ह्या मातीवर दूरवर जाते
जे गर्भात सांधले असते
तिथवर पोहोचून क्षण गाते.

ती हळवीच भावना ना रे
जी शब्दांत गुंतत नाही
तो नि:शब्द गर्भजाणिवा
शब्दांवर तोलत नाही.

ती जाणीव गहिऱ्या हृदयी
अनंत लहरी जपते
अन गर्भातून डोकावताना
ती नाजूक क्षण जोजवते.

तुझं आभाळ दूर-दूर ना!
ती गाथा अवर्णनीय
शब्दांच्या खोल जाणिवा
ती थेंब-वारीच अवर्णनीय!

■ श्रद्धा राऊत-बुरले
नागपूर
मो. ९६६५९५८८९४

# स्नेहवन



अशोक एक साधा, पण असामान्य युवक होता. तो एका शेतकरी कुटुंबात जन्मला होता. त्याचे आई-वडील शेतात काबाडकष्ट करीत होते. त्याचे घर आणि शेत कायमच आर्थिक अडचणींचा सामना करीत होते. अशोक बालपणापासूनच या कठीण परिस्थितीला सामोरा गेला होता. त्याच्या आई-वडिलांचा चेहरा कधीच आनंदाने भरलेला दिसला नाही! कारण प्रत्येक दिवसच एक नवीन संघर्षाचा होता.

गावातील शेतकरी कुटुंबांच्या दुःखाची गोष्ट सर्वांनाच माहिती होती. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, त्याच्या कुटुंबातील अनाथ झालेले मुलं, उघड्यावर पडलेले संसार, यामुळे अशोकला तीव्र मानसिक त्रास होऊ लागला. तो रोजच हे पाहून हळवा होई. त्याचं हृदय काहीतरी करायला हवं, असा आवाज देत होतं.

अशोकने शिक्षणात लक्ष घालण्याचा निर्णय घेतला. त्याला अशी आशा होती की, शिक्षणाचं सामर्थ्य त्याला काहीतरी बदल घडवायला मदत करेल. त्याने खूप मेहनत घेतली, आणि आयटी क्षेत्रात नोकरी मिळवली. त्याने आयटी इंजिनियर म्हणून उच्च पगाराची नोकरी केली. पण नोकरी करीत असताना, त्याचे मन नेहमी त्या दुःखी मुलांचा, शेतकऱ्यांच्या कुटुंबांचा आणि त्यांच्यापासून होणाऱ्या वेदनांचा विचार करीत राहायचं.

एका रात्री कामावरून परत येताना अशोक विचार करीत होता. 'काहीतरी करायला हवं... याही मुलांना एक चांगलं भविष्य द्यायचं आहे.' त्याच्या मनात एक विचार आला 'माझ्या कुटुंबात.. समाजात.. बांधवांत..जे दुःख होते, ते मी कसे संपवू शकेन? त्यासाठी काहीतरी वेगळं करायला पाहिजे.' त्याने ठरवले की अनाथाश्रम सुरू करूया.

अशोकने सुरुवात केली. दोन छोट्या रूम्स भाड्याने घेतल्या आणि सात ते आठ मुलांना त्यात आश्रय दिला. त्या मुलांचे जीवन अत्यंत हलाखीचे होते. ते सर्व शेतकरी कुटुंबातील होते. शाळेतील शिक्षण आणि सुरक्षित आश्रय हा त्यांच्या जीवनातील पहिला सोनेरी क्षण होता.

अशोकने या मुलांना शाळेत दाखल करून त्यांचे सर्व काही व्यवस्थित सुरू केले. त्यांना एक सुरक्षित आणि प्रेमळ घर दिले. येथे त्यांना जगण्याची एक नवी दिशा मिळाली. अशोक त्यांना केवळ शिक्षणच नव्हे, तर जीवनाच्या तत्त्वज्ञानाची शिकवण देत असे. त्याने त्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी प्रोत्साहित केले, आणि जीवनातील कष्टाचे महत्त्व समजावून सांगितले.

हे सर्व करीत असताना अशोकने पाहिलं की, या उपाययोजनांनी या मुलांच्या आयुष्यात मोठा बदल घडविला होता. ते शिकत होते, खेळत होते, आणि नवा आत्मविश्वास मिळवत होते. अशोकने त्यांना एक लक्ष्य दिलं 'कधीही हार मानू नका, कारण तुमच्या जीवनात तुम्हीच सर्वात मोठे हिरो आहात.'

जस-जसा वेळ जाऊ लागला, तस-तशी अशोकच्या अनाथाश्रमाची वाहवा सुरू झाली. मुलं मोठी होऊ लागली. शाळेत उत्तम गुण मिळवू लागली. काही मुलं तर उच्चशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभी राहिली. गावाच्या इतर मुलांसाठी अशोक एक आदर्श बनला.

अशोकच्या यशाचं गुपित त्याच्या मनाच्या दृढतेत आणि त्या मुलांच्या भविष्यावर त्याने दिलेल्या प्रेमात होतं. त्याच्या आयटी क्षेत्रातील पगाराची नोकरी कधीच त्याच्या हृदयाचा भाग बनली नाही. त्याचे खरे सुख त्याच्या अनाथाश्रमात पाहिलेल्या मुलांच्या हसऱ्या चेहऱ्यांत होतं.

अशोकने जेव्हा अनाथाश्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्याच्या मनात एक स्पष्ट दृष्टिकोन होता. मुलांना शिक्षण आणि आत्मनिर्भरतेच्या मार्गावर आणणे. त्याने त्यासाठी दोन एकर जमीन घेतली होती. येथे त्याने एका संपूर्ण आश्रयस्थळाची उभारणी केली. हा आश्रम एक साधे, पण अत्यंत आधुनिक आणि शिक्षणासोबतच जीवन कौशल्यांची शिकवण देणारे केंद्र बनले.

अनाथाश्रमाची इमारत अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून बांधली गेली. मुख्य इमारतीच्या छतावर सोलर सिस्टिम बसवला होता. यामुळे आश्रमात पूर्णपणे स्वच्छ आणि हरित उर्जेचा वापर होत होता. पाणी व्यवस्थापनासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टिम स्थापित केली होती. यामुळे पावसाचे पाणी साठवून शौचालय आणि उद्यानासाठी वापरता येत होतं. मुलांसाठी गोबर गॅस निर्माण करणारी यंत्रणा ठेवली होती, ज्यामुळे गॅस तयार होतो आणि स्वच्छतेसाठी लागणाऱ्या इतर गोष्टींसाठीही त्याचा वापर केला जातो. इथे गोपालन देखील होतं, जिथे मुलं दूध, दही ,पनीर असे दुग्धजन्य पदार्थ तयार करायचे. गायींची काळजी घ्यायचे. इथे आणखी एक सुविधा होती ओपन लायब्ररी आणि खेळणी लायब्ररी. ओपन लायब्ररीमध्ये विविध वाचनासाठी पुस्तकांचा खजिना होता, आणि मुलांना प्रत्येक आठवड्यात एक पुस्तक वाचण्याचा नियम लागू केला गेला होता. यामुळे त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण झाली आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊ लागला. खेळणी लायब्ररीमध्ये मुलांना शारीरिक आणि मानसिक विकासासाठी विविध खेळणी मिळत होती.

आश्रमात आणखी एक अद्वितीय सुविधा होती, इलेक्ट्रिकल वर्कशॉप, केमिस्ट्री आणि बॉयोलॉजी लॅब्ज! मुलं इथे आधुनिक शास्त्रीय प्रयोग करू शकत होती! आणि विज्ञानात रुची निर्माण होत होती. या सर्व कक्षांच्या माध्यमातून मुलांना वैज्ञानिक दृष्टिकोन आणि व्यावहारिक ज्ञान मिळत होतं.

म्युझिक लॅब हे एक वेगळेच आकर्षण होतं. ह्या लॅबमध्ये सर्व प्रकारची वाद्ये होती. मुलांना वादन शिकवले जात होते. अशोकने मुलांना एक गोष्ट ठरवून दिली होती की, 'प्रत्येकाने किमान एक वाद्य वाजवायला शिकले पाहिजे.' यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढत होता, आणि संगीत शिकणे त्यांना मानसिक शांती आणि आनंद देत होतं.

मुलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी फॅशन डिझाईन आणि शिलाईयंत्रे होती. इथे मुलं कपडे डिझाइन करू शकत होती. शिवाय पिठाची गिरणी, ग्रेव्ही मिक्सिंग मशीन, आणि पापड तयार करण्याची मशीन, चपाती मशीन अशा विविध यंत्रांद्वारे कौशल्य शिकवले जात होते. ह्या सुविधांद्वारे मुलं व्यवसायिक कौशल्यांमध्ये पारंगत होऊन स्वतःचे जीवन सुटसुटीत बनवण्याच्या मार्गावर होते.

आश्रयाची आणखी एक मोलाची गोष्ट होती, ती म्हणजे आध्यात्मिकतेला महत्त्व देणे. रोजचा हरिपाठ, आणि 'राम कृष्ण हरी' म्हणून मुलांनी एकत्र केलेला नमस्कार. यामुळे वातावरणात एक आध्यात्मिक शांती होती. मुलांच्या हृदयात धर्माची आणि संस्कृतीची शिकवण रुजवण्यासाठी या प्रथांचे पालन करून घेतले जायचे.

अशोकने आश्रमाच्या शिस्तीलादेखील महत्त्व दिलं. मुलांना कॉन्व्हेंट स्कूलसारखे ड्रेस दिले. आश्रमात वेळोवेळी विविध तज्ज्ञ, विचारवंत, समाजसेवक, लेखक, कवी येऊन मुलांना मार्गदर्शन करीत होते. शिक्षण, व्यवसाय, जीवन कौशल्य आणि मानसिक विकासावर भाषणं चालायची. ही मुलं प्रेरित होऊन आत्मविश्वासानी परिपूर्ण होती. त्यांना जीवनाच्या कठीण परिस्थितीचा सामना कसा करावा, हे इथे शिकवले जात होते.

अशोकच्या या अनाथाश्रमाच्या माध्यमातून, मुलांना एक नवा दृष्टिकोन मिळाला. त्यांचं जीवन आता फक्त भाकर-भाजीवर अडकलेलं नव्हतं, किंवा फ्रीज, फ्लॅट ह्यातच अडकून नव्हते, तर त्यांना एक सूज्ञ, सशक्त आणि आत्मनिर्भर भविष्य मिळवायचं होतं. स्वावलंबन आणि समाजाच्या भल्यासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा त्यांच्यात अशोकने पेरली होती.

अशोकच्या मनानं एक ठरवलेलं होतं. मुलं फक्त शिकली पाहिजेत, असं नाही. त्यांना स्वावलंबी आणि समाजासाठी काहीतरी करणारे व्यक्तिमत्त्व बनवले पाहिजे. त्याच्या याच विचारधारेवर आधारित, त्याच्या आश्रमाने नवा आदर्श निर्माण केला.

आश्रमातील प्रत्येक मुलाने आत्मविश्वासाने आणि मेहनतीने आपले स्वप्न साकारले होते. त्यांची जीवनाची दिशा आता स्पष्ट होती. त्यांच्या प्रत्येक पावलावर एक नवा सूर्य उगवत होता. अशोकने जो परिवर्तन आणले, ते यथार्थ होते. एका दिलदार माणसाने सुरू केलेलं .. पाहिलेलं छोटं स्वप्न, आज एका सशक्त आणि आत्मनिर्भर पिढीचे भविष्य उगमस्थान बनलं आहे. ते 'स्नेहवन' या नावाने नावारूपाला आले आहे.

## लघुकथा



■ प्रा. भरत खैरकर
बी-१/७, काकडे पार्क,
तानाजीनगर, चिंचवड, जि. पुणे-३३
मो. ९८८१६१५३२९.



# सावलीची माया

भर दुपारची वेळ. सूर्याने उग्र रूप धारण केलेले होते. बाल्कनीतून बाहेर बघितले, भूतलाला तप्त उन्हाचे चटके बसत असल्याचे का कुणास ठाऊक मनाला जाणवून गेले. लहानपण गाव-खेड्यात गेले असल्याने शेतीला कडक उन्हामुळे पडलेल्या भेगा जवळून बघितल्या म्हणून असेल कदाचित! आजू-बाजूचा परिसर उन्हाच्या तडाख्याने स्तब्ध होता. एरवी दिवसभर या रस्त्यावर बरीच वर्दळ असते. घरासमोरील रस्त्याच्या कडेला तटस्थ उभा असलेला विशाल आम्रवृक्ष दिमाखात वाटसरूंच्या प्रतीक्षेत असावा. कदाचित आपल्या छत्रछायेत समोरून येणाऱ्या-जाणाऱ्यांना आसरा देण्यास, भर उन्हात तडफडणाऱ्यांना सावली देऊन आसरा देण्याची क्षमता केवळ या वृक्षांमध्येच आहे.

सावलीचा आसरा हवा, म्हणजेच सावली हवीहवीशी! याकरिता काही-काही अंतरावर विशाल वृक्षांची आवश्यकता नाही काय...? वृक्षांची हिरवळ आणि परिसरात गारवा हे समीकरण आहे सावली या शब्दातच किती ममत्व जाणवायला लागते. जणू मायेची सावली, जी आई आपल्या लेकरांना देते. म्हणजेच सावलीत माया-ममता ही भावना दडलेली आहे, असे म्हणावे लागणार नाही काय?

माय-लेकरांचे नाते किंवा इतर रक्तसंबंध, मैत्री, नाती यांच्यातील माया असणे ही नैसर्गिक देण आहे, पण वृक्षवल्लीची सावली उन्हामुळे होणारी अंगाची लाही-लाही शांत करून मन:शांती देते.

## फुलराणी




उन्हाचा दाह मानवप्राणी एवढेच काय, तर पशू-पक्षी-प्राणी आणि निसर्गातील सर्व जीवजंतूंना आपल्या तडाख्यात घेतो. त्यावेळेस गारवा-गारवा म्हणत सावलीचा आसरा शोधला जातो आणि लहान-मोठी झाडे-झुडपे, वृक्ष दिसले की, त्याखाली स्वतःला सुरक्षित जाणवू लागतं.

आज शहरीकरणामुळे परिसरातील हिरवळ लोप पावत चालली आहे, हे कटू असले, तरी सत्य आहे. ज्यावेळी सूर्यदेवता आपला तिसरा डोळा उघडून उष्णतेच्या बळावर धरतीवासीयांवर आक्रमण करते तेव्हा सावलीची कमतरता जाणवू लागते. भर उन्हातून जाणारे मानवप्राणी, एवढेच काय पशू-पक्षी, मुके जनावरसुद्धा रस्त्यावर एखाद्या वृक्षाची सावली दिसली की, त्याखाली थबकून सावलीचा आसरा घेत हायसे होतात. याकरिता सावली हवीहवीशी. म्हणजेच ठिकठिकाणी वृक्षवल्ली हव्यात. आपल्या परिसरात हिरवळ फुलवायला हवी, म्हणजे सावलीची माया प्रत्येकालाच मिळेल.

■ शीला श्रीकांत पवनीकर
नागपूर
मो. ७२७६६१२५१६



# दर्शन अष्टविनायकांचे!

पर्यटन



अष्टविनायक दर्शनासाठी आधी पुण्यापर्यंत ट्रॅव्हल्सने आणि नंतर पुण्यावरून अष्टविनायक दर्शनासाठी ट्रॅव्हलर गाडी निश्चित करता येते. अष्टविनायकासोबतच जेजुरी आणि भीमाशंकर या तीर्थक्षेत्रांनादेखील भेटी देता येतात.

पहिल्या दिवशी क्रमाने थेऊर( चिंतामणी), जेजुरी ( खंडोबा) आणि सिद्धटेक ( सिद्धीविनायक) दर्शन करून रात्री दौंडला मुक्काम करावा. दुसऱ्या दिवशी रांजणगाव ( महागणपती), भीमाशंकर (ज्योतिर्लिंग), मोरगाव (मोरेश्वर), आणि ओझर (श्री विघ्नेश्वर) दर्शन घेऊन लेण्याद्रीला मुक्काम करता येतो. तिसऱ्या दिवशी लेण्याद्री (गिरिजात्मज), महाड (वरदविनायक) आणि पाली (बल्लाळेश्वर) दर्शन घेता येते. महाडला जाताना रस्त्यात लोणावळा येथे निसर्गाच्या सुंदर सानिध्यात फोटोशूट करावे. महाडजवळच पाताळगंगाकाठी असलेला जलतपस्वी गगनगिरी महाराजांचा मठही बघता येतो.

एकंदरीत आनंदाची बाब म्हणजे पुणे आणि परिसरात नुकताच भरपूर पाऊस येऊन गेला असल्याने आजूबाजूचा परिसर हिरवाईने सुंदर झालेला आहे. जणू स्वागताला हसतमुखाने तयार! रस्त्याने जाताना अंगाला स्पर्शून जाणारा गार वारा, मध्येच अंगावर आणि मनातही रोमांच उभे करणारे पाण्याचे तुषार, वाऱ्याची हलकेच कानात गुंजणारी शीळ, सह्याद्रीच्या कडा, हिरव्याकंच पर्वतरांगा, कडे-कपारी, उगाचच इकडून-तिकडे वाऱ्यासवे हातात हात घालून डुलत-डुलत फिरणारे ढग, पक्ष्यांचे आवाज, पहाडांमधून हलकेच वाट शोधत खाली येणारे पांढरेशुभ्र पाण्याचे प्रवाह, काही ठिकाणी डोंगरांनी लपेटलेली धुक्याची चादर आणि सर्वत्र पर्यटकांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहणारा आनंद आणि उत्साह... अहाहा! सर्वच नयनरम्य. निसर्गाने आपल्या पदरात विविध माध्यमातून टाकलेले हे दान आणि त्यातून मिळणारा आनंद निःशब्द करणाराल, तसेच निसर्गाप्रती कृतकृत्य करणाराच!

**थेऊरचा चिंतामणी**

भक्तांच्या मनातील चिंता हरण करणारा आणि थोरल्या पेशव्यांनी ज्याचा विस्तार केला तो थेऊरचा चिंतामणी. डाव्या सोंडेच्या या गणपतीचे लोभसवाणे रूप कायम लक्षात राहील, असे आहे.

**सिद्धटेकचा सिद्धीविनायक**



अष्टविनायकापैकी सिद्धीविनायक हा उजव्या सोंडेचा एकमेव गणपती आहे. पितळीचं मखर आणि चंद्र, सूर्य, गरुड यांची कुसर असलेल्या या सिद्धीविनायकाची श्रीविष्णूने आराधना केली होती, अशी आख्यायिका सांगितली जाते.

**रांजणगावचा महागणपती**

रांजणगावच्या महागणपतीच्या दर्शनाला वेळ साधून सूर्यनारायण दर्शनाला येतात, असं म्हटलं जातं.

**मोरगावचा मोरेश्वर**

मोरया गोसावी याने घेतलेला वसा पूर्ण करीत या मोरेश्वराची आराधना केली. मंदिरात सुंदर आणि कोरीव नक्षीकाम केले आहे. मोरेश्वराच्या दोन्ही बाजूला रिद्धी-सिद्धी विराजमान असून, सभामंडपात नंदी आणि कासव आहेत.

**ओझरचा विघ्नेश्वर**

ओझरचा विघ्नेश्वर हा श्रीमंत गणपती असून, त्याच्या डोळ्यात माणकं आणि कपाळावर हिरा शोभून दिसतात. मंदिराच्या चारी बाजूंनी तटबंदी असून, मध्ये स्वयंभू मंदिर आहे.

**लेण्याद्रीचा गिरिजात्मज**

लेण्याद्री डोंगरावर नदीच्या काठावर गुहेत स्थित असलेला हा गिरिजात्मज. येथील दगडांमध्ये जणू भक्तीभाव ठासून भरला गेला आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. येथे खडकात खोदकाम करून दगडात मंडपी खांब उभारले आहेत. पार्वतीने येथे मातीचा गणपती केला होता, तोच हा गिरिजात्मज, अशी आख्यायिका सांगितली जाते. उंच-उंच पायऱ्या चढताना दमछाक होते. इथे वर जाण्यासाठी पालखीचीही व्यवस्था आहे.

**महाडचा वरदविनायक**

महाडचा वरदविनायक भक्ताला इच्छित वरदान देणारा म्हणून प्रसिद्ध आहे. साधे-सुधे कौलारू घरासारखी रचना असणारे हे मंदिर आहे. घुमटाचा कळस सोनेरी असून, मंदिरात सुंदर नक्षीकाम केले आहे.

**पालीचा बल्लाळेश्वर**

पालीचा बल्लाळेश्वर म्हणजे बुद्धीचा आदिदेव, असे म्हटले जाते. पूर्वाभिमुख स्वयंभू मूर्ती असून, डोळ्यात हिरे असल्याचे सांगितले जाते.

या अष्टविनायक दर्शनाने जीव भारावून ब्रम्हानंदाचा अनुभव येतो. मन प्रसन्न होऊन जाते. केवळ पर्यटनच नाही, तर मनःशुद्धीदेखील होतेच. अष्टविनायककसोबतच घेतलेले जेजुरीच्या खंडोबाचे आणि भीमाशंकरच्या ज्योतिर्लिंगाचे दर्शन म्हणजे दुधात साखरच.

'येळकोट येळकोट जय मल्हार', असा जयघोष करीत भक्त सुमारे ४०० पायऱ्या चढून जातात. जेजुरी गावात जेजुरी गडावरील हे खंडोबाचे मंदिर हेमाडपंथी आहे. मंदिरातील खंडोबाची अश्वारूढ मूर्ती आणि अनेक मूर्ती

**पहिल्या दिवशी क्रमाने थेऊर ( चिंतामणी), जेजुरी ( खंडोबा) आणि सिद्धटेक(सिद्धीविनायक) दर्शन करून रात्री दौंडला मुक्काम करावा. दुसऱ्या दिवशी रांजणगाव ( महागणपती), भीमाशंकर (ज्योतिर्लिंग), मोरगाव (मोरेश्वर), आणि ओझर (श्री विघ्नेश्वर) दर्शन घेऊन लेण्याद्रीला मुक्काम करता येतो. तिसऱ्या दिवशी लेण्याद्री (गिरिजात्मज), महाड (वरदविनायक) आणि पाली (बल्लाळेश्वर) दर्शन घेता येते. महाडला जाताना रस्त्यात लोणावळा येथे निसर्गाच्या सुंदर सानिध्यात फोटोशूट करावे. महाडजवळच पाताळगंगाकाठी असलेला जलतपस्वी गगनगिरी महाराजांचा मठही बघता येतो.**

लक्षणीय आहेत. येथे भंडारा म्हणून खंडोबाला वाहिलेली, उधळलेली हळद आणि त्यामुळे पिवळाजर्द झालेला परिसर म्हणजे जणू पिवळी चादर अंथरल्याचा भास करून देणारी. अवघा आसमंत यामुळे पिवळाधम्म झाल्याचे दिसते. परिसरातील कमानी आणि दीपमाळा लक्ष वेधून घेतात. गडावर उंच जागी विराजमान असलेल्या खंडोबाच्या दर्शनाला जाताना, चढाव्या लागणाऱ्या पायऱ्या थोडी दमछाक करणाऱ्या!

भारतातल्या १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले भीमाशंकर हे पवित्र स्थान होय. वळणा-वळणाच्या रस्त्याने जातानाचा प्रवास, मध्येच घाट, चढ-उतार, आजू-बाजूची झाडं, डोंगर, तलाव एकूणच निसर्गाची आनंदानुभूती करुन देणारे आहे. हिरवी वनराई आणि धुक्याची पांढरीशुभ्र चादर डोंगर-माथ्यांनी आणि दऱ्या-खोऱ्यांनी पांघरलेली पाहून भान हरपून गेले नाही तरच नवल!

**■ डॉ. माया पराते- रंभाळे**
नागपूर

# गूगलचा चष्मा साधणार संवाद

टेक्नो टॉक



गूगलने त्यांच्या गूगल आय/ओ २०२५ या वार्षिक डेव्हलपर कॉन्फरन्समध्ये अनेक आश्चर्यकारक घोषणा केल्या आहेत. यावेळी कंपनीचे संपूर्ण लक्ष आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) वर होते. या परिषदेत सर्वाधिक चर्चेचा विषय म्हणजे गूगलचे नवीन स्मार्ट चष्मे.

हे चष्मे अँड्रॉइड एक्सआर तंत्रज्ञानावर आधारित आहेत. या चष्म्यांमध्ये गूगलचा शक्तिशाली जेमिनी एआय वापरण्यात आला आहे. एका कार्यक्रमात स्मार्ट ग्लासचे प्रदर्शन करण्यात आले. तिथे दोन गूगल प्रतिनिधी होते. एक हिंदी बोलणारा आणि दुसरा फारसी होते. कोणत्याही भाषेच्या अडथळ्याशिवाय ते संवाद साधू शकले. हे सर्व शक्य झाले ते चष्म्यातील एआय फीचरमुळे. ते दोघांनाही संभाषण इंग्रजीत भाषांतरित करून समजण्यास मदत करीत होते. म्हणजे आता संवादात भाषा अडथळा ठरणार नाहीत.

हे चष्मे केवळ भाषांतरच करीत नाहीत, तर वापरकर्त्यांच्या प्रश्नांची उत्तरेदेखील देऊ शकतात. म्हणजे आता तुम्हाला काही माहिती हवी असेल तर, फक्त प्रश्न विचारा. चष्मा तुम्हाला लगेच उत्तर देईल!

या कार्यक्रमात गूगलने अँड्रॉइड एक्सआर प्लॅटफॉर्मची घोषणा केली. तो क्वालकॉम आणि सॅमसंगच्या सहकार्याने विकसित करण्यात आला आहे. या नवीन प्लॅटफॉर्मचा उद्देश स्मार्टफोनच्या पलीकडे जाऊन स्मार्ट ग्लासेससारख्या उपकरणांमध्येदेखील अँड्रॉइड अनुभव प्रदान करणे हा आहे. गूगलच्या म्हणण्यानुसार, प्रोजेक्ट मोहन अंतर्गत अँड्रॉइड एक्सआर यावर्षीच लाँच केला जाईल. कंपनीने स्मार्ट चष्म्याच्या किमतीबाबत अद्याप कोणतीही माहिती दिलेली नसली, तरी लवकरच त्याची किंमतही उघड होईल.

गूगलचे हे पाऊल स्मार्ट ग्लासेस आणि मेटाव्हर्स यासारख्या प्रकल्पांमध्ये आधीच सहभागी असलेल्या मेटासोबत थेट स्पर्धा मानले जात आहे. गूगल ग्लास आणि अँड्रॉइड एक्सआर दोन्ही प्लॅटफॉर्म वापरकर्त्यांना एक नवीन डिजिटल अनुभव देण्याचा दावा करतात. या कार्यक्रमात गूगलने एचपीच्या सहकार्याने गूगल बीम हे नवीन व्हिडीओ कम्युनिकेशन डिव्हाइस सादर केले. याशिवाय गूगल मीटमध्ये लाईव्ह ट्रान्सलेशनची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या भाषांमधील लोक एकमेकांशी सहजपणे बोलू शकतील. एवढेच नाही तर कंपनीने व्हिडीओ जनरेशन प्लॅटफॉर्म व्हीओ ३ची एक नवीन आवृत्तीदेखील लाँच केली आहे. त्यात आता नेटिव्ह साउंड सपोर्ट असेल आणि व्हिडीओ बनवणे सोपे होईल. कंपनीला फक्त स्मार्ट फोनपुरते मर्यादित राहायचे नाही! ■

### इन्स्टा स्टोरी बनवा आकर्षक

**सध्या इन्स्टाग्राम स्टोरीजची चलती आहे. तुमच्या स्टोरीज अधिक आकर्षक पद्धतीने सादर करून अधिकाधिक फॉलोअर्स मिळवता येतील. यासाठी तुमच्या स्टोरीला साजेसं संगीत जोडा. इन्स्टाग्रामचं म्युझिक फीचर यासाठी उपयोगी पडेल. इंस्टाग्राममध्ये स्टोरीसोबत एखादं कोडं जोडण्याची सोय आहे. त्याचा वापर करा. फॉलोअर्ससाठी प्रश्नोत्तराचं सत्र ठेवा. तुमच्या स्टोरीबाबत इतरांची मतं घेता येतील. यामुळे तुमची स्टोरी जास्तीत-जास्त फॉलोअर्सपर्यंत पोहचू शकेल.**

### ऑन करा गेस्ट मोड

**आपला स्मार्टफोन इतरांच्या हातात देण्याआधी छोटं सेटिंग करून बघा. अँड्रॉइड स्मार्टफोनमध्ये गेस्ट मोड असतो. तो ऑन केल्यानंतर दुसरं कोणी तुमचे फोटो वा इतर चॅट बघू शकत नाही. तुमचा फोन अगदी नव्यासारखा होतो. हा मोड ऑफ केल्यानंतर स्मार्टफोन पुन्हा आधीसारखा होतो. यासाठी फोन सेटिंग्जमध्ये जा. इथे यूझर अकाउंट्स हा ऑप्शन्स दिसेल. या ऑप्शनमध्ये गेस्ट मोड दिसेल. हा मोड ॲक्टिव्हेट करून तुम्ही इतरांना स्मार्टफोन द्या.**

# 'मेटा'चे नवीन एआय चॅटबॉट


वेचक-वेधक




तंत्रज्ञानाच्या जगात आणखी एक मोठे पाऊल टाकत, मेटाने त्यांचं नवीन एआय चॅटबॉट ॲप लाँच केलं आहे. हे ॲप आता थेट ओपन एआयचा लोकप्रिय एआय चॅटबॉट, चॅटजीपीटीसोबत स्पर्धा करीत आहे. विशेष म्हणजे मेटाने ते केवळ एआय चॅटबॉट म्हणून लाँच केलं नाही, तर सोशल टचसह ते बाजारात आणलं आहे.

मेटाचे हे चॅटबॉट ॲप, आपण काय बोलतो, ते समजून घेऊन त्यानुसार उत्तर देतं. आपण त्याच्याशी टेक्स्ट आणि व्हॉइस, अशा दोन्ही प्रकारे संवाद साधू शकतो. सोप्या शब्दांत सांगायचं झालं तर, येणाऱ्या काळात ते आपल्या वैयक्तिक एआय असिस्टंटसारखं काम करू शकेल. ते हळूहळू तुम्हाला समजून घेण्यास आणि चांगली उत्तरं देण्यास सुरुवात करेल. मेटा एआयचे महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे डिस्कव्हर फीड होय. यात आपण आपले मित्र एआयला काय विचारत आहेत आणि त्यांना किती मजेशीर उत्तरं मिळत आहेत, हे पाहू शकतो. उदाहरणार्थ, एक यूझर एआयला सांगतो, मी कशा प्रकारचा माणूस आहे ते मला तीन इमोजीमध्ये सांगा! याचं उत्तर तो त्याच्या मित्रांसोबत शेअर करतो. अर्थात, आपलं कोणतंही संभाषण आपल्या इच्छेशिवाय शेअर केली जाणार नाहीत. या ॲपमध्ये आता एक नवीन व्हॉइस मोड देण्यात आला आहे. आता आपण बोलून प्रश्न विचारू शकतो आणि एआयदेखील बोलूनच त्याची उत्तरं देईल! ■

माय कॅमेरा



पिछोला तलाव राजस्थानातील उदयपूर जिल्ह्यात आहे. हा तलाव उदयपूरच्या ऐतिहासिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. उदयपूर शहराच्या मध्यभागी असलेला हा तलाव अरवली पर्वतरांगांनी वेढलेला आहे. त्यामुळे त्याचे नैसर्गिक सौंदर्य आणखी खुलते. त्याच्या सभोवतालचे राजवाडे आणि घाट खूपच आकर्षक दिसतात. पर्यटकांसाठी या तलावात बोटिंगची सुविधा आहे.

वेगवेगळ्या पिकनिक स्पॉटवर फोटो काढण्याची क्रेझ सध्या वाढते आहे. हे लक्षात घेऊन वाचकांनी काढलेल्या आकर्षक आणि कलात्मक छायाचित्रांना 'माय कॅमेरा' या सदराअंतर्गत प्रसिद्धी देण्यात येईल. छायाचित्राबाबत थोडक्यात माहितीही वाचकांनी पाठवावी. छायाचित्रे पाठविण्याचा पत्ता:
lokshahivartapratibimb@gmail.com

## राशिभविष्य

(रविवार २२ जून ते शनिवार २८ जून २०२५)



**मेष : कर्तृत्वाला संधी**

विवाहेच्छूंची अपेक्षित जोडीदाराची भेट होईल. संसारसुखाचा आनंद लाभेल. कर्तृत्वाला योग्य संधी देणाऱ्या उपक्रमात सहभागी व्हाल. स्वतःच्या प्रगतीसाठी सहकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची मदत घ्यावी लागेल. अमावास्या उत्कर्षाची आहे. काहीजणांना कामानिमित्त प्रवास करावा लागला, तरी उद्दिष्टपूर्ती होण्याची शक्यता आहे. उत्तरार्ध संवेदनक्षम आहे.

**वृषभ : संशोधन क्षेत्रात कर्तृत्व**

वाढत्या प्रेमाच्या आकर्षणातून तरुणांनी सामाजिक मुल्यांचादेखील विचार करणे आवश्यक आहे. अमावास्येच्या आसपास आर्थिक संकेत लाभतील. अमावास्या कुटुंबसुखाची आणि स्नेहभोजनाचा आनंद देणारी आहे. प्रतिष्ठावृद्धी करणारे प्रसंग येतील. उत्तरार्धात प्रशंसायोग्य कामे हातून होतील. सप्ताहाच्या शेवटी संशोधन आणि तत्सम क्षेत्रात उत्तम कर्तृत्व घडेल.

**मिथुन : सुखवृद्धीची खरेदी**

स्त्रियांशी मैत्री आनंददायी राहील. अनाठायी खर्चाची खंत वाटेल. सरकारी कामे लांबणीवर पडतील. स्वतःच्या आरोग्य रक्षणार्थ आहारातील नियमितपणा आवश्यक आहे. जवळची नाती आणि हितचिंतक यांच्या संबंधातील आपुलकी कमी झाल्याची जाणीव होईल. तुमच्या स्थानात होणारी अमावास्या मानसिक संतुलन बिघडविणाऱ्या घटना घडवेल.

**कर्क : चंचलता टाळा**

दैनंदिन कामाना विलंब होईल. नातेवाईक आणि आप्तेष्ट यांची नाराजी दूर करण्यात यश मिळण्याची शक्यता नाही. तुमच्या राशीच्या व्यय स्थानात होणारी अमावास्या मानसिक चिंता वाढविणारी आणि नैराश्यजनक प्रसंगांचा सामना करायला लावणारी आहे. मानसिक चंचलतेमुळे निर्णय क्षमता कमी होईल व पर्यायाने त्याचा परिणाम कार्यक्षमतेवर होईल.

**सिंह : नोकरदारांना पदलाभ**

महिलांच्या पाठिंब्यामुळे नावलौकिक वाढेल. मंगळवारी होणारी रवी-गुरू युती विविध कारणाने अत्यंत लाभदायक ठरेल. नोकरदारांना मान-सन्मान आणि पदलाभ होईल. अमावास्या भाग्यकारक घटना घडवेल. उत्तरार्धातील बुध आणि गुरू यांचे भ्रमण मोठे प्रगतीकारक राहील. उत्तरार्धात अनेक इच्छा-आकांक्षा पूर्ण होणार असल्या, तरी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेल.

**कन्या : खर्च वाढण्याची शक्यता**

चैनीच्या अतिरेकाने आरोग्य बिघडणार नाही, याची खबरदारी घ्या. रवी-गुरू युती यशप्राप्ती देणारी आहे. अमावास्या अधिकार देणारी असली, तरी त्यासाठी संघर्ष करावा लागेल. सप्तम स्थानातील शनी आणि व्यय स्थानातील शनी आपल्या जोडीदाराला अनारोग्यकारक असून, आरोग्यरक्षणार्थ खर्च वाढविण्याची शक्यता आहे. सप्ताहांती आपली संवेदनशीलता आपल्याला अचूक उत्तरे शोधून देईल.

**तुला : मन:स्वास्थ्य जपावे**

पत्नीचे आरोग्य नाजूक राहील. नोकरी आणि व्यवसायात स्त्रियांकडून मनस्ताप संभवतो. अनपेक्षित घटनांनी मनःस्वास्थ्य बिघडण्याची शक्यता आहे. गुरू भ्रमण भाग्यवृद्धी करणारे असले, तरी मंगळवारी होणारी रवी-गुरू युती नोकरीत एखादा मानसिक ताण वाढविणारा प्रसंग आणण्याची शक्यता आहे. अमावास्येला आलेल्या अडचणी सोडविण्यात कालव्यय होईल.

**वृश्चिक : पारदर्शकता ठेवा**

वैवाहिक जीवनात गैरसमज वाढू नयेत, यासाठी पारदर्शकता ठेवा. अष्टम स्थानातील रवी-गुरू युती नोकरी आणि व्यवसायात अप्रतिष्ठादर्शक आहे. प्रदूषित अन्न-पाणी आरोग्य बिघडविण्याची शक्यता आहे. अमावास्या अपयशाचा सामना करायला लावेल आणि मनःस्वास्थ्य बिघडवेल. तुमचा एकलकोंडेपणा नात्यात दुरावा निर्माण करण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात संततीच्या प्रगतीबाबत पालक काळजीत राहतील.

**धनु : संतुलित वागावे**

संततीची प्रगती पालकांना आनंद देणारी राहील. वरिष्ठांशी मतभेद झाल्यास माघार घेणे योग्य ठरेल. अमावास्या आपल्या वैवाहिक जोडीदाराचे आरोग्य नाजूक ठेवेल. भौतिक सुखांच्याबाबत गुरू भ्रमण अपेक्षापूर्ती करणारे आहे. उत्तरार्धात आप्तेष्टांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करा. सप्ताहाच्या शेवटी विविध कौटुंबिक प्रसंगात भावनांचा प्रभाव जास्त राहील.

**मकर : संकेतांकडे लक्ष द्या**

कौटुंबिक आघाडीवर ऐषआराम राहील. स्नेहभोजनाचा आनंद घ्याल. तुमचे वर्चस्व राखण्यात यश लाभले, तरी नात्यातील आपुलकी राखण्यात प्रयत्न कमी पडतील. अमावास्या नोकरदारांसाठी निर्वेध प्रगतीची आणि व्यापाऱ्यांसाठी व्यापार वृद्धिंगत करणारी राहील. उत्तरार्धात आपल्या संततीसाठी फास्ट फूड अनारोग्यकारक ठरण्याची शक्यता आहे. सप्ताहाच्या शेवटी अंतर्मनाच्या संकेतांकडे विशेष लक्ष द्या.

**कुंभ : प्रतिष्ठावृद्धीचे प्रसंग**

सामाजिक जीवनात प्रतिष्ठावृद्धी करणारे प्रसंग घडतील. कला, जाहिरात, सजावट, अशा क्षेत्रात, तसेच पर्यटन क्षेत्रात व्यवसायवृद्धीचे संकेत आहेत. नोकरदारांना वरिष्ठांकडून प्रशस्तीलाभ होईल. संततीइच्छूंना आनंदवार्ता लाभतील. उत्तरार्धात एकाग्रतेच्या अभावाने बौद्धिक क्षेत्रातील कामांना विलंब होईल. घेतलेला निर्णय योग्य आहे याची खातरजमा करणे योग्य ठरेल

**मीन : विरंगुळा लाभेल**

स्त्रियांनी केलेल्या व्यवसायात, तसेच स्त्रियांसाठी केलेल्या व्यवसायात, अपेक्षित उलाढाल होईल. स्वतःचे आणि आपल्या आप्तेष्टांचे आरोग्य मोलाचे राहील. एखाद्या जवळच्या व्यक्तीच्या विरहाच्या प्रसंगातून जावे लागेल. अनेक इच्छा-आकांक्षा पूर्ण होणार असल्या, तरी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेल. उत्तरार्धात मित्रांच्या सहवासात विरंगुळा लाभेल. तुमच्या राशीतील शनी हा नैराश्यकारक भावनांचा प्रभाव वाढवत राहतील. मानसिक संतुलन साधू शकलात, तर योग्य निर्णय योग्यवेळी घेऊ शकाल.

**■ ज्योतिषभास्कर शिरीष कुलकर्णी**
मो. नं. ८७८८२६६६९०